# जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे.
# न्यायालयीन भरती प्रक्रिया - २०२३

## -: उमेदवारांसाठी सुचना :-

१. उमेदवारांनी परिक्षा हॉलमध्ये येतांना मोबाईल, पेनड्राईव्ह, कॅलक्युलेटर, स्मार्ट वॉच इत्यादी जवळ बाळगु नयेत. तसेच उमेदवारांना त्यांचेकडील संगणकाचे साहित्य उदा. कि-बोर्ड, माऊस इ. वापरण्यास सक्त मनाई आहे.

२. उमेदवारांनी स्वतःचे मुळ ओळखपत्र सोबत बाळगणे आवश्यक आहे. तसेच प्रशासनाकडून ज्यावेळेस मागणी केली जाईल त्यावेळी दाखवणे आवश्यक आहे.

३. उमेदवारांच्या परिक्षेबाबतची सर्व माहिती जिल्हा न्यायालय, पुणे यांचे खालील अधिकृत संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत केली जाईल. उमेदवारांनी खालील संकेतस्थळावरील परिक्षेच्या माहितीबाबत अद्ययावत राहावे.

**OFFICIAL WEBSITE OF DISTRICT COURT, PUNE**

https://pune.dcourts.gov.in/notice-category/recruitments/

४. उमेदवाराने आपापल्या जागेवर बसण्यापूर्वी टेबलवर नमुद केलेला रोल नंबर आपल्या बॅचनुसार स्वतःचा असल्याची खात्री करावी.

५. पर्यवेक्षकांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे उध्दट वर्तन व असहकार्य करणा-या उमेदवारास परिक्षेमधून त्वरीत बाहेर काढले जाईल.

६. आपल्या समोरील संगणक चालू स्थितीमध्ये असेल संगणकाचे अथवा विद्युत जोडणीचेकोणतेही बटन दाबू नये तसेच इतर कोणतेही ॲप्लीकेशन, विंडो, फोल्डर, फाईल इत्यादी ओपन करु नये.

७. संगणकावर टंकलेखन उतारा टाईप करण्यासाठीची फाईल आगोदरच ओपन केलेली असेल त्याचा पेज-सेटअप तयार करुन ठेवलेला असेल **(उदा. पेज सेटिंग, फॉन्ट, मार्जिन, लाईन मधील स्पेसिंग इत्यादी) पेज सेटअपमध्ये कुठल्याही स्वरुपाचा बदल उमेदवाराने करु नये संगणकामध्ये अथवा संगणकाच्या सेटींगमध्ये कोणताही बदल** केल्यास व त्यामुळे मजकुराची प्रिंट बिघडल्यास अथवा इतर कोणतीही अडचण उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. तसेच भरती प्रक्रियेतून उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८. उमेदवार त्याचे जागेवर बसल्यानंतर त्याला त्याचे संगणकाच्या स्क्रीनवर फाईल ओपन दिसेल त्यामध्ये उमेदवारांनी खालील माहिती तपासावी.

६.१ बॅच क्रमांक या चौकोणामध्ये आपणांस जो बॅच क्रमांक देण्यात आलेला आहे तो तपासून पहावा.

६.२ जिल्हा न्यायालय, पुणे अ.नं. या चौकोणामध्ये आपणांस जो अनुक्रमांक (PDCJC च्या पुढील) देण्यात आलेला आहे तो तपासून पहावा.

६.३ रजिस्ट्रेशन नंबर ( नोंदणी क्रमांक )
यामध्ये आपणांस BHCDC च्या पुढील आपला ७ अंकी रजिस्ट्रेशन नंबर तपासून पहावा. **उदा. ९२६०४ असल्यास तो ००९२६०४**

६.४ अप्लीकेशन नंबर (अर्जाचा अनुक्रमांक )

यामध्ये आपणांस JC च्या पुढे आपला अप्लीकेशन नंबर तपासून पहावा.

**उदा. १६०६ असल्यास तो ०००१६०६**

सदरील माहिती अचूक असल्याची खात्री उमेदवाराने करावयाची आहे जर उमेदवाराने उपरोक्त माहिती तपासून अचूक असल्याची खात्री करावी. तसेच माहितीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास अचूक माहिती भरावी. चुकीच्या माहितीमुळे उमेदवाराचे नुकसान झाल्यास त्यासाठी उमेदवार स्वतः जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

९. **फक्त कार्यालयीन वापरासाठी** असा शेरा असलेल्या **रकान्यांमध्ये उमेदवाराने कुठलीही माहिती भरु नये.**

१०. टंकलेखन उतारा चाचणी सुरु होण्यापूर्वी २ मिनिटांची सराव चाचणी सुरु होईल. त्यामध्ये उमेदवाराने टायपिंगचा सराव करावयाचा आहे.

११. सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की, सर्व संगणक व त्यासोबतचे सर्व साहित्य हे नेहमीच्या वापरातील असून ते पूर्णपणे तपासलेले आहेत. परंतु आपणांस किबोर्ड, माऊस अथवा इतर तांत्रिक बिघाड आढळून आल्यास आपण शांततेने सदरील बाब पर्यवेक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी. त्यानंतर लगेचच उमेदवारास इतर संगणक अथवा आवश्यक तो बदल प्रशासनातर्फे करुन दिला जाईल. कोणत्याही परिस्थीतीत शांततेचा भंग होणार नाही व इतर उमेदवारांचे लक्ष विचलीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१२. उमेदवारांनी टाईप केलेला मजकूर वेळोवेळी सेव्ह (save) करण्याची दक्षता घ्यावी. त्याची जबाबदारी स्वतः उमेदवाराची राहील.

१३. टाईप केलेल्या उता-याची प्रिंट उमेदवारांनी तपासावी व ती बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर त्यावर उमेदवारांनी **योग्य त्या ठिकाणीच** आपले नाव व स्वाक्षरी करावी.

१२. उमेदवारांनी त्यांच्या **उत्तरपत्रीकेची एकच प्रिंट काढावयाची आहे.** प्रिंट निघण्यास कोणतीही अडचण आल्यास उमेदवारांनी पर्यवेक्षकांची मदत घ्यावी. **वारंवार प्रिंट कमांड देऊ नयेत.**

१४. उमेदवारांना कोणतेही पेपर अथवा कागदपत्रे परिक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास मनाई आहे.

१५. परिक्षा संपल्यानंतर उमेदवाराने आपल्या जागेवरच बसून रहावयाचे आहे. पर्यवेक्षक आपल्याकडून उत्तरपत्रिका त्यांचे ताब्यात घेतील. त्याची तपासणी पुर्ण झाल्यानंतर आपणांस बाहेर जाणेसाठी सुचना देण्यात येतील त्यानंतरच उमेदवाराने जागेवरुन उठून बाहेर जावे.

सही/-

जिल्हा न्यायालय, पुणे
दिनांक २५/१०/२०२४

(महेंद्र के. महाजन)
प्रमुख जिल्हा न्यायाधिश, पुणे.

……………………